पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८, लेखा विभाग
क्र.लेखा/११/कावि/ ७७३८/१८
दिनांक:- २७/०९/२०१८

विषय:- सल्लागार नेमलेल्या कामांचे बील अदा करताना सादर करावयाचे शिफारस पत्राबाबत.

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे क्षेत्रात विविध स्वरूपाची विकास कामे चालू आहेत. यातील काही कामे JNNURM व विशेष योजनेच्या अंतर्गत मोठी कामे चालू असुन सदरच्या कामांसाठी महानगरपालिकेने सल्लागार नेमलेले आहेत. सल्लागारांच्या सल्ल्यानुसार ठेकेदार कामे करतात व त्यांची बिले लेखा विभागात अदायगीकामी पाठविली जातात. तथापि सदरच्या बिलाची तपासणी केली असता ब-याच बीलांमध्ये केलेल्या कामाचे बीलासोबत सल्लागार यांचे शिफारसपत्र दिसुन येत नाही. तरी यापुढे सल्लागार नेमलेल्या कामाची बीले अदा करताना संबंधित बिलासोबत सल्लागारचे बील अदा करणेबाबतचे शिफारस पत्र जोडणेत यावे. अन्यथा अशी बीले लेखा विभागामार्फत अदा केली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

मुख्यलेखापाल
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

प्रत:- संबंधित विभाग

--------------------------------

--------------------------------

Scanned by CamScanner